ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख २१ मार्च, १९५१ अंक १२

## दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)
स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—सर्व प्रकारचे बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन
श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर

फोन: ३४५१९ तार: SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या (प्रोड्यूसर्स) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करते:—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन. टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करते:—

हातमागावरील कापड (सुती व लोंकरी), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखा:—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

—सर्व प्रांतांतील— सुती-गरम-रेशमी —खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६१, बुधवार पेठ ढमढेरे बोळाजवळ, पुणें २.

दळणाच्या चक्क्या-टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स,
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधु, लक्ष्मी रोड, पुणें शहर.


## विविध माहिती

**डिझेल एंजिन्सचा कारखाना**—बंगलोरमध्यें सेडॅन डिझेल एंजिन्सचा कारखाना काढण्याची एखादी योग्य योजना पुढें आल्यास म्हैसूरचें सरकार त्यासाठीं सवलती देण्यास तयार असल्याचें संस्थानचे उद्योग मंत्री श्री. दासप्पा ह्यांनीं एका प्रसंगीं बोलून दाखविलें, भारतांतील पैसे गुंतविणाऱ्या लोकांनीं दूरदृष्टि ठेवून देशाभिमानी वृत्तीनें भांडवल गुंतवावें; लवकरांत लवकर आणि जास्तींत जास्त नफा मिळविण्याची कल्पना त्यांनीं सोडून द्यावी, असा उपदेशहि त्यांनीं केला.

**अहमदाबादच्या कामगारांना बोनस**—१९४९ सालीं अहमदाबादमधील कापडाच्या ५१ गिरण्यांना नफा झाला. ह्या गिरण्यांनीं आपल्या कामगारांना दोन महिन्यांचा पगार बोनस म्हणून द्यावा असा निवाडा औद्योगिक कोर्टानें दिला आहे. ५५२ लाख रु. नफ्यापैकीं १२० लाख रु. बोनस म्हणून वांटण्याचा हुकूम झाला आहे. ज्या दहा गिरण्यांना नफा झाला नाहीं, त्यांच्यासंबंधीं कोर्ट निराळा निवाडा देणार आहे. बोनसची रकम ३१ मे पर्यंत द्यावयाची आहे.

**हवामानविषयक आंतरराष्ट्रीय परिषद्**—जागतिक हवामान-विषयक परिषद् पॅरिस येथें ता. १५ मार्चपासून सुरू झाली. परिषदेला भारतातर्फे डायरेक्टर जनरल ऑफ ऑब्झरवेटरीज श्री. व्ही. व्ही. सोहनी व त्यांचे दुय्यम श्री. बसू हे गेले आहेत. आंतरराष्ट्रीय हवामानसंघटनेचें स्वरूप संयुक्तराष्ट्रसंघटनेच्या जागतिक आरोग्यसंघटनेप्रमाणें करण्याचा विचार परिषदेंत करण्यांत येणार आहे.

**'ट्यूब वेल्स' ची योजना यशस्वी**—उत्तर गुजराथमधील विजापूर तालुक्यांत अंमलांत आणण्यांत आलेली 'ट्यूब वेल्स' ची योजना यशस्वी झाल्याचें त्या भागांतील एका स्थानिक पुढाऱ्याचें मत आहे. जी जमीन पूर्वी ओसाड होती अशा जमिनींतून आतां गहूं, बाजरी, कापूस इ. पिकें काढण्यांत येत आहेत. ह्या योजनेमुळें २,५०० एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होऊं लागला असून तिचा फायदा २० चौ. मैलांतील शेतकऱ्यांना मिळत आहे. आणखी बऱ्याच शेतकऱ्यांनीं विहिरी खोदण्याबद्दल अर्ज केले आहेत.

**क्रिकेटच्या खेळांचे शैक्षणिक बोलपट**—एज्युकेशनल फिल्म्स ऑफ इंडिआचे संचालक श्री. राम गोगटे ह्यांनीं क्रिकेटच्या खेळासंबंधींचे दोन शैक्षणिक चित्रपट मिळविले आहेत. 'क्रिकेट कस खेळावें' ह्या बोलपटांत डॉन ब्रॅडमन कसोटीच्या सामन्यांत खेळतांना दाखविले आहेत. त्यांनीं खेळासंबंधीं कांहीं सूचनाहि दिल्या आहेत. दुसऱ्या बोलपटांत लेन हटन ह्या खेळाडूनें फटकारे कसे मारावे त्याचें प्रात्यक्षिक दिलेलें आहे. दोन्ही चित्रपट फक्त शाळांतूनच दाखविण्यांत येणार आहेत.

**औषधांचे सात नवे कारखाने**—परदेशीय कंपन्यांची मदत घेऊन भारतांत औषधांचे सात नवे कारखाने काढण्यांत येणार असल्याचें समजतें. त्यांचीं नांवें अशीं—(१) हिंद सिलाग लि. कानपूर (२) निएल्हा फार्मास्यूटिकल्स लि. कलकत्ता, (३) साराभाई केमिकल्स, (४) बूटस ड्रग लि. (इंडिया), (५) रिकेट अँण्ड कोलमन लि. (६) फार्मा लि. (बेसल) (७) अलका ॲण्ड केमिकल कॉर्पोरेशन लि. (इंडिया)

**उंच इमारतीची उंची वाढणार**—न्यूयॉर्कमधील एम्पायर स्टेट बिल्डिंग ही इमारत जगांतील सर्वांत उंच इमारत आहे. तिचेवर २२२ फूट उंचीचा एक पोलादाचा मनोरा उभारण्यांत येणार आहे. मनोऱ्याचें शेवटचें टोक रस्त्यापासून १,४७२ फूट उंचीवर असेल. मनोऱ्याचा उपयोग टेलिव्हिजनचे कार्यक्रम क्षेपित करण्यासाठी होईल.

**देशी दारू व अफू ह्यांवर वाढता कर**—संयुक्त प्रांताच्या ज्या भागांतून देशी दारूवर कमी कर होता, त्या भागांत १ एप्रिलपासून तो वाढविण्यांत येणार आहे. दर गॅलनवर ३ रु. च्या जागीं आतां ७ रु. कर घेण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें अफूच्या दर शेराची किंमत २४० रु. ७ आण्यांवरून २८० रु. करण्यांत आली आहे.

**भारतासाठी जपानी बोट**—युद्धोत्तर काळांत भारतासाठी जपानमध्यें बांधण्यांत आलेली पहिली बोट नुकतीच पाण्यांत लोटण्यांत आली. ही बोट माल वहातुकीची असून ती २,००० टनांची आहे. बोटीचें नांव जलगंगा आहे. तिची गति ताशीं साडेदहा नॉटस् आहे.

**भारताचें इंग्लंडमधील प्रदर्शन**—भारताच्या संरक्षण खात्यातर्फे सध्या एक प्रदर्शन लंडनमध्यें भरविण्यांत आलें आहे. प्रदर्शनांत भारतासंबंधीं माहिती चित्रांच्या द्वारें देण्यांत आलेली आहे. प्रदर्शन पहाण्यासाठी विद्यार्थ्यांची बरीच गर्दी होत असते. ह्या प्रदर्शनांत १०० वर्षांपूर्वीचीं हत्यारें ठेवण्यांत आलीं आहेत. त्यांत गारगोटीच्या साह्यानें उडविण्यांत येणाऱ्या बंदुका आणि कुकरी हींहि हत्यारें आहेत.

**५०० माणसांचें काम करणारें यंत्र**—एक रशियन शास्त्रज्ञ आणि एंजिनिअर ह्यांनीं मिळून एक यंत्र तयार केलें आहे. हें यंत्र एकाच वेळीं कालवा खणणें, नांगरणें, पाणी उपसणें, झाडें उपटणें, नळ घालणें, इतकीं कामें करतें. यंत्राचें सहाय्य न घेतां हीं कामें करण्यास सुमारें ४०० ते ५०० माणसें लागतील. ह्याचा अर्थ, इतकीं माणसें दुसऱ्या कामासाठीं मोकळीं झालीं असा होतो.

**अंड्यांच्या उत्पादनाची योजना फसली**—आफ्रिकेंतील गॅंबिआ ह्या ब्रिटिश वसाहतींत कोंबड्यांच्या अंड्यांच्या उत्पादनाची योजना ब्रिटिश सरकारनें पुरस्कृत केलेली होती. परंतु ती अयशस्वी झाल्याचें कॉमन्स सभागृहांत नुकतेंच कबूल करण्यांत आलें. वसाहतीच्या जमिनींत कोंबड्यांना लागणारें खाद्य तयार होईना म्हणून हें अपयश आलें.

**जपानच्या बादशहाची मालमत्ता**—जपानचा बादशहा हिरोहिटो हा एकेकाळीं कोट्याधीश होता. परंतु आतां त्याच्याजवळ फक्त ७१,००० डॉलर्सची मालमत्ता राहिली आहे.

**शेतीच्या केंद्रांची स्थापना**—देशांतील व्यापारी व औद्योगिक कंपन्यांच्या साह्यानें ठिकठिकाणीं शेतीचीं केंद्रें स्थापन करण्याचा विचार भारतीय सरकार करीत आहे. अशीं शेतें स्थापन करण्यांत आलीं, तर त्या त्या कंपन्यांच्या नौकर वर्गाला अन्नधान्याचा पुरवठा होऊन देशांतील अवघड अन्नधान्य परिस्थिति थोडीबहुत सुधारेल असा अंदाज करण्यांत आला आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २१ मार्च, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पाकिस्तानला आजवर नशिबाचा हात

"तुला प्रत्येक आर्थिक व व्यापारी साहसांत नशीब हात देईल" असा पाकिस्तानला त्याच्या जन्माच्या वेळीं दैविक वर मिळालेला असावा, इतका नशीबवान तो देश ठरला आहे. गेल्या तीन वर्षांतील त्याच्या प्रत्येक साहसांत त्याला दैवानें मदत केलेली आहे. उत्पन्नांत अनपेक्षित वाढ, जागतिक मागणींत एकाएकीं वाढ, पिकांची सुबत्ता, इतकेंच नव्हे तर जरूरीप्रमाणें एकदम अगदीं कमी पीक, इ. मार्गांनीं नशिबानें पाकिस्तानास उचलून धरलें आहे. पाकिस्तानच्या आजच्या परिस्थितीस त्याच्या राज्यकर्त्यांच्या कर्तृत्वानें जेवढा हातभार लावला असेल, त्यापेक्षां नशीबाचा वाटा कितीतरी मोठा आहे.

आपल्या चलनाचें अवमूल्यन न करण्याचें ठरविण्यांत पाकिस्ताननें केवढा तरी मोठा सट्टा केला होता. पाकिस्तानी रुपयाचें भारताच्या रुपयावरील वर्चस्व एकाद्या वर्षाचे पलीकडे टिकेल असें त्यावेळीं कोणासहि वाटलें नाहीं. ताग, कपास, लोकर आणि कातडीं ह्यांच्या निर्गतीचे प्रश्नावरच सर्व कांहीं अवलंबून होतें. परंतु, कोरियांतील लढा सुरू झाल्याबरोबर प्रत्येक देश आवश्यक त्या कच्च्या मालाचा सांठा करूं लागला आणि पाकिस्तानच्या निर्गत मालाची किंमत एकसारखी चढत गेली. त्याच्यावर भरमसाट निर्गत जकात बसवून फायदा मारण्याची संधि पाकिस्तानला मिळाली. कपाशीवरील जकात तर गाठीस ६० रुपये होती ती ३०० रु. वर गेली. पाकिस्तानच्या वार्षिक बजेटांतील इतर उत्पन्नाच्या बाबींच्या मानानें कपाशीवरील जकातीचें २४ कोटी रु. चें उत्पन्न कितीतरी मोठें आहे. तांदूळ, गहूं, इ. बाबतींतहि पाकिस्तान स्वयंपूर्ण आहे.

विशिष्ट जागतिक घडामोडींमुळें पाकिस्तानला हे कांहीं तात्कालिक मोठे फायदे झाले असले, तरी दीर्घकालीन दृष्टीनें विचार केला तर त्यांत कांहीं तोटेहि पण आहेत. पाकिस्तानच्या औद्योगीकरणाची तातडीनें गरज असतांहि तो प्रश्न ह्या सुलभसाध्य सुबत्तेमुळें मागें पडला आहे. पाकिस्तान कितीतरी मूलग्राही महत्त्वाच्या जिनसांसाठी परावलंबी आहे आणि ते मिळविण्यासाठीं पाकिस्ताननें आतां प्रारंभ केला असला तरी तो रांगेमध्यें बराच मागें आहे. जिनसांचा पुरवठा मात्र आटत आला आहे. अगदीं विना-आयास पैसे मिळविण्याची व्यापारी वर्गाला संवय लागली आहे; भांडवल लवकर फिरतें राहून तात्काळ नफा त्यानें द्यावा अशी अपेक्षा निर्माण झाली आहे. त्यामुळें औद्योगिक उपक्रमांकडे कोणाचेंहि लक्ष नाहीं. पाकिस्तान सरकार ह्याबाबत प्रयत्न करीत आहे, पण त्यांत यावें तसें त्यास यश मिळणें अशक्यप्राय आहे.

हिंद-पाकिस्तान व्यापारी करारास असलेली ही पार्श्वभूमि "एकॉनॉमिस्ट" च्या कराची येथील प्रतिनिधीनें वरीलप्रमाणें वर्णन केली आहे. काळाबाजार आणि नफेबाजी ह्यांच्या संवयीचे दुष्परिणाम भारतासही भोगावे लागत आहेत आणि देशाच्या औद्योगीकरणास पुरेसें भांडवल पुढें येत नाहीं, अशी येथेंहि तक्रार आहे. तथापि, पाकिस्तानची सुस्थिति आजच्याप्रमाणेंच कायम टिकण्याचा संभव नाहीं; तात्कालिक परिस्थितीचा त्यास फायदा मिळत आहे एवढें खरें. तेव्हां, हिंद-पाकिस्तान व्यापारी करारानें त्या फायद्यांत भरच पडणार असली, तरी भारतानें ती टाळण्यासाठी स्वतःचें नुकसान किती काळ चालू ठेवावयाचें हा मुख्य प्रश्न आहे. भारताला आपलें अंतर्गत उत्पादन वाढविण्यास व त्याची किंमत उतरविण्यास थोडी सवड हवी आहे. परंतु तिचा उपयोग नीट करण्यांत आला नाहीं तर परराष्ट्रीय व्यापार नुकसानकारक झाल्याविना रहाणार नाहीं. पाकिस्तानच्या रुपयानें भारताच्या रुपयावर आज मात केली असली तरी त्यांत नशिबाचाच भाग जास्त आहे; परदेशांतील परिस्थितीच्या ताणाचें तें प्रतिबिंब आहे, अंतर्गत मजबुतीचें तें निदर्शक नाहीं. भारताची अंतर्गत आर्थिक मजबुती वाढली, तर त्याचें अर्थकारणच केवळ नव्हे तर राजकारणहि अधिक प्रभावी होईल.

## सुताची सहकारी गिरणी

मद्रास राज्याचे मुख्य मंत्री, श्री. कुमार स्वामी राजा ह्यांच्या हस्तें त्रावणकोर को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटचा रौप्य-महोत्सव साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं भाषण करतांना त्यांनीं गुंटकल येथें लवकरच निघणाऱ्या सहकारी गिरणीची माहिती सांगितली. ह्या गिरणींत १२,००० चात्या असतील. गिरणींत दर महिना सरासरी ७०० सुताच्या गांसड्या तयार होतील असा अंदाज आहे. गिरणी काढण्यासाठीं सुमारें ३० लाख रुपये भांडवल लागेल. हें भांडवल मद्रास हँडलूम वीव्हर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी आणि तिच्याशीं संलग्न असणाऱ्या संस्था मिळून जमा करणार आहेत. गिरणींत दर महिना सुताचें जें उत्पादन होईल, त्यामुळें मद्रास राज्यांतील हातमागाच्या सहकारी संस्थांची फक्त दशांशच गरज भागूं शकेल. असें असलें तरी भविष्यकाळाचा एक मार्ग म्हणून ह्या गिरणीचें महत्त्व आहेच. अशा प्रकारच्या गिरणीमुळें होणारे फायदे उघड आहेत. एकतर, बऱ्याच हातमाग कामगारांना योग्य अशा भावांत सुताचा पुरवठा होऊं शकेल. सध्या सुताचा पुरवठा अत्यंत अपुरा असल्यामुळें त्यांची उपासमार होत आहे. सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी गिरणी व्यवस्थित चालविण्यांत आली तर सुताच्या उत्पादनाची बरोबर किंमत काढणें शक्य होईल. सहकारी गिरणीची उत्पादनाची किंमत आणि खाजगी गिरण्यांची उत्पादनाची किंमत ह्यांची तुलना करतां येईल आणि बाजारांतील सुताची किंमत योग्य पातळीवर राखणें सरकारला शक्य होईल. सहकारी तत्त्वावर गिरणीसारखा मोठा व्यवसाय करण्यांत यश आलें तर संपूर्ण राष्ट्रीयीकरण आणि खाजगी उद्योगधंदे ह्या दोन टोकांच्या मधील मार्ग निघाला असें म्हणतां येईल.

### इराणमधील तेलाचा भडका उडणार काय ?

पर्शिया ( इराण ) मधील तेलाच्या खाणी अँग्लो–इराणियन कंपनीच्या मालकीच्या आहेत. ह्या प्रचंड कंपनीची तेथील मालमत्ता २१ कोटी पौंडांपेक्षा जास्त आहे. तिच्या २,०१,२७,५०० पौंड ऑर्डिनरी भागांची बाजारभावानें होणारी किंमत १०,५०,००,००० पौंडापेक्षा जास्त भरते. ह्या शेअर्सपैकी १,१२,५०,००० पौंडांचे ऑर्डिनरी भाग ब्रिटिश सरकारच्या मालकीचे असून त्यांची बाजारभावानें ५,९०,००,००० पौण्ड किंमत होते.

पर्शियांतील तेलाच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण करण्यांत यावें असें पार्शियन मजलिसनें १५ मार्चच्या बैठकींत एकमतानें ठरविलें आहे. हें राष्ट्रीयीकरण झालें तर ब्रिटिशांच्या तेल कंपनीस गाशा गुंडाळावा लागेल, आणि पर्शियाचें फार मोठें परावलंबन नाहींसें होईल. सहाजिकच ब्रिटिश सरकारचा ह्या राष्ट्रीयीकरणास विरोध आहे. कांहीं झालें तरी अँग्लो–इराणियन तेल कंपनीच्या हितसंबंधास बाध येऊं दिला जाणार नाहीं, असें ब्रिटिश सरकारनें निक्षून जाहीर केलें आहे. पर्शियाचे माजी महामंत्री जन. अलि रझमारा ह्यांच्या मतें तेलाचा हा धंदा हातीं घेण्याइतकें तांत्रिक ज्ञान व आर्थिक बळ इराणजवळ नाहीं, म्हणून राष्ट्रीयीकरण त्यांना नको होतें. त्यांचें हें मत लोकमताविरुद्ध होतें आणि म्हणून त्यांचा कांहीं दिवसांपूर्वी खून झाला. आपल्या देशांतील एकमेव महत्त्वाचा धंदा परकीयांच्या तंत्रानें चालावा ही गोष्ट इराणी लोकांस अपमानास्पद वाटूं लागली आहे. कंपनीचा इराण सरकारशीं असलेला करार १९९३ पर्यंत राहावयाचा असून तो एकटा इराण रद्द करूं शकणार नाहीं, असें ब्रिटिश सरकारचें मत आहे. इराणमधील तेलाच्या प्रकरणास बरेंच महत्त्व प्राप्त होणार आहे, असें दिसत आहे.

---

**बँक ऑफ राजस्थान**— ज्वाला स्टेट बँक, रामचंद्र लक्ष्मण चक, बुंदी स्टेट बँक आणि शहापुरा स्टेट बँक ह्या चार बँका त्यांच्या शाखांसकट राजस्थान स्टेट बँकेंत सामील करून घेण्याचें राजस्थान सरकारनें ठरविलें आहे. वरील बँकांकडे असलेल्या ठेवी तूर्त पहिल्याच अटींवर राजस्थान बँकेकडे येतील. बँकिंगच्या व्यवहाराचें चालू वर्ष संपल्यावर राजस्थान बँकेकडून ठेवीदारांना नव्या अटी सादर करण्यांत येतील आणि त्यांची इच्छा असल्यास ठेवी पुढें चालू ठेवण्यांत येतील.

**संयुक्त राष्ट्रसंघाचें पुढील अधिवेशन**—संयुक्त राष्ट्रसंघाचें पुढील अधिवेशन ता. ६ नोव्हेंबर १९५१ च्या सुमारास ठेवण्यांत आलें आल्यास अधिवेशनाची सोय पॅरिसमध्यें होऊं शकेल असें राष्ट्रसंघाच्या जनरल सेक्रेटरींना कळविण्यांत आल्याची बातमी आहे.

**हृदयाचें कलम करण्याचा प्रयोग**—श्री. डेमिलव्हॅाव नांवाच्या एका रशियन डॉक्टरनें पहिल्या हृदयाच्या जागीं दुसरें हृदय बसविण्याचा प्रयोग चालविला आहे. सध्या हे प्रयोग कुत्र्यावर करण्यांत येत आहेत. एका कुत्र्याचें हृदय व फुप्फुसें काढून त्याचें दुसऱ्या कुत्र्यावर कलम करण्यांत ह्या डॉक्टरला यश आल्याचें समजतें.

**अफूचा कारखाना बंद होणार**—भारतीय सरकार कोटा येथील अफूचा कारखाना बंद करणार असल्याचें समजतें. ह्या कारखान्यांत बिगर–औषधी उपयोगासाठीच फक्त अफू तयार करण्यांत येते. १९५९ पर्यंत कोणत्याही प्रकारनें पोटांत अफू घेण्याचें बंद करण्याचें सरकारचें धोरण आहे. त्या धोरणांतील हें पहिलें पाऊल आहे.


# NOTICE

## THE BANK OF AUNDH LIMITED

Notice is hereby given that, the Thirteenth Ordinary General Meeting of the Share-holders of The Bank of Aundh Limited, will be held at the Head-Office of the Bank, 111/112, Sadashiv Peth, Satara City, on Sunday the 8th April, 1951 at 4 P. M. (S. T.) to transact the following business :–

1. To receive and adopt the Balance Sheet, the Profit and Loss Account Statement, the Report of the Directors, and of the Auditors, for the year ended 31st December, 1950.
2. To declare a Dividend.
3. To elect Directors in place of those retiring by rotation and who are eligible for re-election.
4. To appoint Auditors and to fix their remuneration.

By Order of the Board,

Satara. } B. W. Ghamande,
1st March, 1951. } Manager

*N. B.* :—The Share Transfer Books of the Bank will be closed from the 8th April, 1951 to 22nd April, 1951 both days inclusive.

---

The dividend when sanctioned will be payable on and after Monday the 23rd April, 1951 and Dividend Warrants will be posted to the Registered addresses of the Share-holders. *Change of address if any, should immediately be communicated to the Bank.*

---

## THE BANK OF POONA LIMITED

### DIRECTORS' REPORT AND STATEMENT OF ACCOUNTS

For the

*Year ended 31st December, 1950.*

NOTICE is hereby given that the Fifth Annual Ordinary General Meeting of the Share Holders of the Bank of Poona Limited will be held at the Registered Office of the Bank, 455 Raviwar Peth, Poona City, on Wednesday 4th April 1951 at 6 p. m. (Standard Time) to receive the Report of the Directors and the Audited Accounts for the year ended 31st December 1950, to elect Directors in place of those retiring by rotation and to appoint Auditors and fix their remuneration.

By Order of the Board,

Poona City, } G. G. Sathe,
15th Feb. 1951. } Manager.

*N. B.*—The Transfer Books of the Bank will be closed from Wednesday the 28th March 1951 to Wednesday the 11th April 1951, both days inclusive.

## पिकांच्या वाढीचे यशस्वी प्रयत्न

( वा. कृ. कोगेकर )

उत्तर प्रदेशांतील शेतकऱ्यांकडून पिकांचे उत्पन्नवाढीच्या बाबतींत यशस्वी प्रयत्न झाल्याचें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. सध्याच्या अन्नधान्याच्या कमतरतेच्या काळांत अशा प्रयत्नांची अत्यंत सर्वत्र आवश्यकता आहे. हे प्रयत्न गव्हाच्या व बटाट्याच्या पिकांच्या संबंधानें झालेले आहेत व हीं दोन्हीं पिकें खाद्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचीं आहेत.

### गव्हाच्या व बटाट्यांच्या उत्पन्नांत वाढ

उत्तर प्रदेशांतील मीरत जिल्ह्यामध्यें एका शेतकऱ्यानें गव्हाचें दर एकरीं उत्पन्न ५८ मण, १३ शेर काढलें. अर्थात् हें उत्पन्न बागायती गव्हाचें होय. मुंबई इलाख्यामध्यें बागायतामध्यें गव्हाचें पीक चांगलें आल्यास सर्वसाधारणपणें सुमारें २० ते २५ मणापर्यंत येतें. म्हणजे, वरील उत्तर प्रदेशांतील उत्पन्न इकडील उत्पन्नाच्या दुप्पटीच्यावर आलेलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

बटाट्याचें उत्पन्न वरील प्रदेशांतील एका शेतकऱ्यानें ६७९ मण, २१ शेर एकरी काढलेलें आहे. पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांत बटाट्याचें उत्पन्न, पीक चांगलें आल्यास, एकरी सुमारें २०० ते २२० मणापर्यंत येतें. यावरून वरील उत्तर प्रदेशांतील उत्पन्न तिप्पट आलेलें आहे असें दिसून येईल.

वरील उत्पन्न काढण्याकरितां झालेल्या प्रयत्नांच्या दिशेसंबंधीं माहिती उपलब्ध झालेली नाहीं. तथापि, योग्य प्रयत्नानें उत्पन्नांत वाढ करतां येणें शक्य आहे हें यावरून दिसून येतें.

परदेशाहून धान्य आणवणें हें किती खर्चाचें आहे व त्यामुळें किती खर्च आपल्या देशास करावा लागतो हें अमेरिकेहून येणाऱ्या गव्हाच्या बाबतींत प्रसिद्ध झालेल्या आंकड्यावरून दिसून येतें. अमेरिकेकडून २० लक्ष टन मागण्यांत आलेल्या गव्हाची किंमत अंदाजें ९० कोटी रु. धरण्यांत आलेली आहे. हा गहूं विनामूल्य मिळणार आहे ही गोष्ट वेगळी, परंतु हा गहूं आणण्याचा खर्च सुमारें १० कोटी रु. येणार आहे. हा खर्च कांहीं कमी नाहीं. देशांत उत्पादन वाढल्यास हे खर्च वांचून त्यांचा उपयोग लहान-मोठे बंधारे, धरणें, वगैरेकडे होऊं शकेल. सबब धान्याचें उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न उत्तर प्रदेशाप्रमाणें इतरत्रहि होण्याची आवश्यकता आहे हें उघड आहे.

---

## शेतकऱ्यांच्या उद्धाराचा प्रश्न

( श्री. वृगाजी अजबा पाटील, सटाणें. )

"सहकार्याला शिक्षणाइतकेंच महत्त्वाचें स्थान आपल्या जीवनांत आहे. सक्तीचें शिक्षण जरूर हवें तर तितक्याच आग्रहानें आपलें दारिद्र्य नाहींसें करण्याला सक्तीचा सहकार हवा असें म्हटल्यास फारसें वावगें होणार नाहीं. पण ही चळवळ स्वयंस्फूर्त आणि लोकशाहीच्या कांहीं मूलभूत तत्त्वावर आधारलेली असल्यानें हें म्हणणें कांहींना पटणार नाहीं. आज चळवळीस सुरुवात होऊन जवळजवळ अर्ध शतक झालें, पण त्या मानानें केलेल्या श्रमाचें दृश्य रूप फारसें दिसत नाहीं. यांत अनेक अडचणी आहेत हें आपण जाणत आहों. तेव्हां यांतून पाऊल पुढें कसें टाकावें याचा आपण विचार साकल्यानें केला पाहिजे.

"गेल्या पांच-सहा वर्षांत आपल्या देशांत अनेक घडामोडी झाल्या. युद्धानें निर्माण झालेल्या परिस्थितीशीं आपण अजून झगडत आहोंत. सहकारी संस्थांनीं या सर्वांमध्यें प्रामुख्यानें भाग घेतला आहे. नव्या कामगिरीबरोबर नवीन संस्था अस्तित्वांत आल्या आहेत. जनहित साधणें हें सर्वांचें ध्येय आहे. तथापि पैशाची तरतूद केली कीं, सर्व शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतील अशी आजवर आपली कल्पना होती ती फोल ठरली आहे. म्हणून केवळ पतपेढ्यांचाच विचार करून भागणार नाहीं, तर सहकारी ग्राहक संघ, खरेदी विक्री संघ, मार्केट कमिट्या, हौसिंग सोसायट्या, औद्योगिक संस्था, वगैरेंचाहि विचार व्हावयास पाहिजे असें आम्हांस वाटूं लागलें आहे. एकटा नाशिक जिल्हा घेतला तर आपल्या जिल्ह्या-मध्यें एकूण ६३५ सहकारी संस्था आहेत. त्यापैकीं ३८५ पतपेढ्या व ४० मल्टीपरपज सोसायट्या आहेत. उरलेल्या २१० संस्था निरनिराळ्या क्षेत्रांत काम करीत आहेत. या सर्वांचे मिळून ५८,७८७ सभासद आहेत. जवळजवळ रु. २६ लाखांचें शेअर भांडवल व रु. २५ लाखांचा रिझर्व फंड असून आज खेळतें भांडवल रु. ८७ लाखांचें आहे. शेंकडा २५ टक्के जनसंख्या या चळवळींत सामील झाली असून जिल्ह्यांतील १७२६ खेड्यांपैकीं ८२६ खेड्यांत म्हणजे ४८ टक्के खेड्यांत या चळवळीचें लोण पोंचलें आहे. शेतकऱ्यांना सुमारें रु. २५ लाख चालू वर्षाकरितां कर्ज देण्यांत आलें आहे. शहरामध्यें आणि खेड्यापाड्यांतील अन्नधान्य वांटपाचें काम बऱ्याच अंशीं आपण घेतलें आहे. बीबियाणा, शेतीचीं अवजारें, यांची सोय खरेदी विक्रीसंघामार्फत करण्यांत येत आहे. लोखंड, सिमेंट, पेंड व खतें हीं तालुका डेव्हलपमेंटमार्फत वाटण्यांत येत आहेत. ग्रामसुधारणा मंडळामार्फत विहिरी खोदण्याकरितां, यंत्रें विकत घेण्याकरितां वगैरे अल्प मुदतीची तगाई देण्यांत येत आहे. शेतकी खात्यामार्फत अनेक सुधारणा करण्याकरितां उपाय योजण्यांत येत आहेत. कांदा, बटाटा व इतर भाजीपाला याकरितां वेगवेगळे अधिकारी नेमले आहेत. शेतीच्या मालाचीं वजनें, मापें व विक्री योग्य भावांत कसोशीनें व्हावी म्हणून मार्केट कमिट्या स्थापन करण्यांत आल्या आहेत. शेतकऱ्यांचीं कर्जें नाहींशीं व्हावींत, त्यांच्या मागचा सावकाराचा ससेमिरा नाहींसा व्हावा, म्हणून ऋणविमोचनाचा कायदा, सावकारी नियंत्रण कायदा करण्यांत आला आहे. मी ही यादी आतां फार लांबवत नाहीं. पण अशा रीतीनें पहात गेल्यास एका शेतकऱ्याचें हित साधण्याकरितां किती हीं खातीं व केवढी ही तज्ज्ञ मंडळी उभी आहेत हें पाहून मोठें कौतुक वाटतें. पण प्रत्यक्ष कार्य पहावें, शेतकऱ्याची स्थिति पहावी, ती जी आज पिढ्यानुपिढ्या चालत आली तीच आहे. एकावर एक अशी ही अधिकाऱ्यांची व हितचिंतकांची मालिका उभी केल्यामुळें बिचारा गरीब शेतकरी या ओझ्याखालीं खचून गेला असल्यास नवल काय ? यांतच नवे नवे राजकीय पक्ष अस्तित्वांत येत आहेत. प्रत्येकजण आपापल्या परीनें शेतकऱ्याचें हित करूं पहात आहे. या सर्वांपासून "परमेश्वरा, माझें रक्षण कर" असें म्हणण्याची आज पाळी आली आहे. याचा अर्थ हीं सर्वस्वी नको आहेत असें नव्हे, पण यामुळें परावलंबी वृत्ति आणि अकारण हेवेदावे शेतकऱ्यांमध्यें अधिक वाढत आहेत ती नको आहेत. सहकार हा परावलंबनाकरतां नाहीं; परस्परास सहाय्य करून आपला उद्धार आपणच करूं हें त्याचें ब्रीदवाक्य आहे. याला अनुसरून आपली विचारसरणी वाढवावयास पाहिजे, एवढेंच माझें सांगणें आहे." ( नाशिक जि. स. परिषदेंतील स्वागताध्यक्षीय भाषण )

**इंडियन प्रोग्रेसिव्ह इं. कं. लि.**

दि इंडियन प्रोग्रेसिव्ह इन्शुअरन्स कं. लिमिटेड पुणें, या कंपनीचा १९४९ सालचे कामकाजाचा अहवाल, ताळेबंद, रेव्हेन्यू अकाऊंट, १९४९ अखेरचे मूल्यमापनाचा अहवाल, हे पहातां कंपनीची सर्वांगीण प्रगति झाल्याचें दिसून येतें. गेल्या पांच वर्षांत कंपनीस इनकमटॅक्स वजा जातां सरासरी दरसाल दरशेंकडा साडेतीन टक्के व्याज मिळालें आहे. कंपनीचा सरासरी रिन्युअल एक्सपेन्स रेशिओ १५.७८ टक्के इतकाच आहे. कंपनीचें मूल्यमापन अवघें २½ टक्के व्याजाचा दर धरून करण्यांत आलें आहे. पुढील खर्चासाठीं नफ्यासहितचे विम्याबाबत हप्त्यांतील १९ टक्के व बिन-नफ्याचे विम्याबाबत १६ टक्के तरतूद करण्यांत आली आहे. कंपनीचे हप्त्याचे दर अत्यंत माफक असूनहि कडक दरानें मूल्यमापन करून सुद्धां कंपनीस बोनस वाटणेस पुरेसा नफा उरला आहे ही गोष्ट प्रशंसनीय आहे. १९४८ व १९४९ साला-साठीं हयातींतील नफ्यासहितचे विम्यास दरहजारीं रुपये पांच-प्रमाणें व पश्चात्चे नफ्यासहितचे विम्यास दरहजारीं रुपये सहा प्रमाणें बोनस वाटावा व सदर दराचे तीन चतुर्थांश दरानें इंटेरिम बोनस वाटावा अशी ॲक्चुअरीची शिफारस आहे. विमाधनाची रकम देण्यांत कंपनीनें फारच तत्परता दाखविली आहे. १९४१ मधील क्लेमचे सर्व पैसे १८-१-१९५० पर्यंत दिले आहेत ही गोष्ट विशेषेंकरून उल्लेखनीय आहे. कंपनीचे सेक्रेटरी श्री. अ. ना. गाडगीळ यांनीं अत्यंत चिकाटीनें व निरलसपणें या कार्यास सदैव वाहून घेऊन कंपनीचा कारभार अत्यंत दक्षतेनें व काटकसरीनें करून कंपनीस आजची योग्यता मिळवून दिली, त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

---

**सहकारी शेतकी पतपेढीचा ताळेबंद**

( सहकारी वाङ्मय माला, पुष्प दुसरें. लेखक- डी. ए. सावंत, असि. डि. को. ऑफिसर, रामनिवास बंगला, शाहूपुरी, कोल्हापूर. पृष्ठ संख्या १००. किंमत १। रु. )

सहकारी चळवळीचा प्रसार खेडोपाडीं होण्यासाठीं शिक्षित सेवकवर्गाची अत्यंत मोठी जरूरी आहे. शिक्षणाच्या अभावामुळें लायक सेक्रेटरींचाहि तुटवडा आढळतो आणि सेक्रेटरींना जमा-खर्च तयार करणें कित्येक वेळां साधत नाहीं. श्री. डी. ए. सावंत ह्यांचा सहकारी चळवळींतील अनुभव व त्यांची कळकळ ह्याची पुष्कळांना माहिती आहेच. त्यांनीं सोसायट्यांच्या सेक्रेटरींच्या मार्गदर्शनासाठीं प्रस्तुत पुस्तक लिहिलें आहे, त्यावरून हिशेब-पद्धति समजावून घेणें त्यांना सहज शक्य होईल. पुस्तक अगदीं सोप्या भाषेंत व भरपूर उदाहरणें देऊन लिहिलें आहे, हें त्याचें एक वैशिष्ट्य आहे.

---

**मद्रास कॉर्पोरेशनचें कर्ज**—मद्रास शहरांतील गलिच्छ वस्तीची सुधारणा करण्यासाठीं कॉर्पोरेशननें १५,००,००० रुप-यांचें कर्ज काढण्याचें ठरविलें होतें. कर्जावरील व्याजाचा दर ३¾ टक्के आणि मुदत १० वर्षांची होती. कर्ज घेण्यासाठीं ३१,२५,००० रुपयांचे अर्ज आले होते. कर्जाच्या रकमेच्या मानानें आलेली मागणी किती तरी अधिक होती.

**फुलाला म. गांधींचें नांव**—न्यूयॉर्कमध्यें ३५ वें फुलांचें आंतरराष्ट्रीय प्रदर्शन नुकतेंच भरविण्यांत आलें होतें. त्यावेळीं न्यू जेरेसी ह्या संस्थानांतील मिसेस हॉप्ट ह्यांनीं गुलाबी रंगाचें एक टपोरें ऑर्किडचें फूल अमेरिकेंतील भारताच्या प्रतिनिधीला सादर केलें. ह्या फुलास ' महात्मा गांधी ' हें नांव देण्यांत आलें आहे.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

फोन नं. २४८३ | तारेचा पत्ता " Cencobank " | पोस्टबॉक्स नं. ५११

मुख्य कचेरी—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर, भोर पौड व वडगांव (मावळ)

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे

मॅनेजिंग डायरेक्टर



# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई, स्थापन साल १९११

चेअरमन:-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. ३३,४१,००० |
| ठेवी | रु. ८,६९,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. १०,४३,९३,००० |

१५ जिल्ह्यांत ६५ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे

जॉ. मॅनेजिंग डायरेक्टर.

### सहकार संपदा

( श्री. पुरुषोत्तम पांडुरंग गोखले, कराड. पृ. सं. ३७. किं. १० आ. )

दि कराड अर्बन को. बँकेचे चेअरमन, व महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध निष्ठावंत सहकारी कार्यकर्ते, श्री. पु. पां. गोखले, ह्यांच्या सार्वजनिक कार्याची कल्पना "अर्था"च्या वाचकांना आहेच. त्यांचीं भाषणें "अर्था"मध्यें वेळोवेळीं उद्धृत करून व त्यांच्या योजनांची माहिती देऊन त्यांच्या ज्ञानाचा व कुशल मार्गदर्शनाचा लाभ वाचकांना आम्ही देत आलोंच आहों. प्रस्तुत छोट्या पुस्तकांत त्यांनीं वेळोवेळीं केलेलीं भाषणें एकत्रित करून छापलीं आहेत. त्यांत त्यांची सहकारी तत्त्वावरील निष्ठा, व्यावहारिकपणा, पुढें येणाऱ्या परिस्थितीचें आगाऊ आकलन व त्यावर उपाययोजना, आर्थिक घडामोडींचें सूक्ष्म निरीक्षण, इत्यादि गोष्टी प्रामुख्यानें दिसून येतात. सहकारी संस्थांच्या चालकांना प्रस्तुत पुस्तिकेपासून चांगली माहिती मिळून व बरेंच मार्गदर्शन होऊन स्फूर्तिहि मिळेल अशी आमची खात्री आहे. सहकार संपदा एकत्रित उपलब्ध केल्याबद्दल श्री. गोखले ह्यांस धन्यवाद दिले पाहिजेत.

---

### भारत बँक मेमोरँडममधील इतर व्यवहार चालू ठेवणार

१० मार्च, १९५१ रोजीं भारत बँक लि. आणि पंजाब नॅशनल बँक लि. ह्यांचेमध्यें करार झाला. त्या अन्वयें, भारत बँकेच्या ठेवीदारांच्या ठेवींच्या परतफेडीची जबाबदारी पंजाब नॅशनल बँकेनें पत्करली आणि त्यासाठीं भारत बँकेनें आपली जरूर तेवढी जिंदगी व येणें पंजाब नॅशनल बँकेस दिलें. ह्या करारास भारत बँकेच्या भागीदारांची संमति मिळविण्यासाठीं एक विशेष साधारण सभा ३० मार्च रोजीं दिल्ली येथें बोलाविण्यांत आली आहे. कंपनी चालू ठेवावी आणि मेमोरँडममध्यें नमूद असलेल्या उद्देशांस धरून योग्य ते व्यवहार बोर्ड वेळोवेळीं ठरवील त्याप्रमाणें करण्यांत यावेत, असाहि ठराव सभेंत मंजुरीसाठीं मांडण्यांत येईल.

---

### पंतांची मोटार

श्री. व. वि. लोणकर, एम. ए, बी. कॉम., ह्यांचा "पंत मोटार घेतात" हा लेख "अर्था"मध्यें नुकताच प्रसिद्ध झाला होता. तो अत्यंत लोकप्रिय ठरला होता. मध्यम वर्गीयांच्या मनोभूमिकेचें मार्मिक चित्रण त्यांत केलेलें होतें. ऑल इंडिया रेडिओच्या मुंबई केंद्रावरून ता. २८ फेब्रुवारी रोजीं त्याचें नाट्य ऐकविण्यांत आलें, तेंहि बहारदार झालें.

---

### भारताच्या रुपयांची पाकिस्तानांत विक्री

स्टेट बँक ऑफ पाकिस्ताननें आपल्या कराची, लाहोर, डाका व चितगांव येथील शाखांत भारतीय रुपये खालील दरानें हजर खरेदी-विक्री करण्याचा अधिकार दिला आहे.

खरेदी:—१०० पाकिस्तानी रुपये = हिंदी १४४ रु. ० आ. ९ पै.

विक्री:—१०० पाकिस्तानी रु = हिंदी १४३ रु. १३ आ. ३ पै.

---

**बंगलोरचा टेलिफोनचा कारखाना**—बंगलोर येथील टेलिफोन तयार करण्याचा कारखाना सप्टेंबर, १९५१ पर्यंत पुरा होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. आतापर्यंत ह्या कारखान्यांत २४,००० टेलिफोन्स तयार झाले. टेलिफोनला लागणाऱ्या ३६५ सुट्या भागांपैकीं ३५५ भाग आतां कारखान्यांत तयार होऊं लागले आहेत.

दि म्हैसूर ग्लास अँड एनॅमल वर्क्स लि., बंगलोर शहर

## नोटीस

कंपनीच्या भागीदारांची १२ वी वार्षिक साधारण सभा रविवार, दिनांक १५ एप्रिल, १९५१ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां यशवंतपूर रेल्वे स्टेशन शेजारच्या, कंपनीच्या कांच कारखान्यांत खालील कामासाठीं भरेलः—

१. ३१ डिसेंबर, १९५० रोजीं संपलेल्या वर्षाचा डायरेक्टरांचा रिपोर्ट, हिशेबतपासनिसांनीं तपासलेला ताळेबंद व नफा-तोटापत्रक हीं विचारांत घेऊन मंजूर करणें.

२. डिव्हिडंड जाहीर करणें.

३. निवृत्त होणाऱ्या डायरेक्टरांचे जागीं डायरेक्टर निवडणें. सदरहु डायरेक्टर कंपनीच्या ११२ व्या आर्टिकलप्रमाणें क्रमानुसार निवृत्त होत असून ते फेरनिवडणुकीस पात्र आहेत व उभे रहात आहेत

४. चालू वर्षासाठीं हिशेबतपासनीस नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरवणें.

ताळेबंदाच्या प्रती भागीदारांना स्वतंत्रपणें रवाना होत आहेत.

३४, गांधीनगर,
बंगलोर शहर.
२६ फेब्रुवारी, १९५१

बोर्डाच्या हुकुमावरून
ओगले ग्लास वर्क्स लि. करितां
शंकरराव प्र. ओगले,
मॅनेजिंग एजंटस्

वि. सू. कंपनीची शेअर ट्रान्स्फर-बुकें ३ एप्रिल १९५१ ते १६ एप्रिल १९५१ असेर ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहतील.

डायरेक्टरांनीं सुचविल्याप्रमाणें भागावरील डिव्हिडंड साधारण सभेंत मंजूर झालें, तर तें १५ मे १९५१ रोजीं किंवा त्यानंतर दिलें जाईल. ३ एप्रिल १९५१ रोजीं ज्या भागीदारांचीं नांवें शेअर रजिस्टरवर असतील, अशांना डिव्हिडंड वारंटस पाठविलीं जातील.

---

### सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास

नाशिक जिल्ह्यांतील को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांच्या सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास कळवण येथें तारीख २५-३-१९५१ ते २०-४-५१ अखेर मुदतीचा घ्यावयाचा आहे. ज्या उमेदवारांस सहकारी शिक्षण घ्यावयाचें असेल त्यांनीं खालीं सही करणार यांजकडे ता. २४-३-५१ चे आंत अर्ज करावेत. अर्जासोबत क्लास फी २ रु. लगत पाठवावी. क्लास फी भरल्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाहीं. उमेवाराचें शिक्षण निदान व्ह. फा. पास झालेला अगर परीक्षेस बसलेला पाहिजे, अगर सहकारी संस्थेंत काम करीत असला पाहिजे. उमेदवारास सदर शिक्षण स्वखर्चानें घ्यावें लागेल. क्लास फी भरल्यावर कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाहीं. क्लासानंतर परीक्षेंत यशस्वी उमेदवारांस सेक्रेटरी म्हणून नेमण्याची व्यवस्था करण्यांत येईल. उमेवारांनीं कळवण येथें तारीख २५-३-५१ रोजीं ११ वाजतां "कळवण तालुका को. सुपरवायझिंग युनियनच्या ऑफिसांत" कळवणला हजर रहावें.

एन्. वाय. कुळकर्णी
को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर,
( घर नं. २१७८, मधली होळी ) नाशिक

## दि बँक ऑफ सिटिझन्स बेळगांव, लि. ची वार्षिक सभा

[ धि बँक ऑफ सिटिझन्स लि. बेळगांव या बँकेच्या भागीदारांची वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेच्या मुख्य कचेरींत ( १५१४, मारुति गल्ली, बेळगांव, येथें ) रविवार ता. ११ मार्च, १९५१ रोजीं सायंकाळीं ४ वा. श्री. चंदुकवाला शेटजी यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेस सुमारें १०० सभासद हजर होते. बँकेचे प्रमुख श्री. जी. डी. सराफ यांनीं, थोड-क्यांत, बँकेचें खेळतें भांडवल रु. ३८ लाखांवर झालें असून यावर्षी निव्वळ नफा रु. ३५,८०० झालेचें सांगितलें. त्याप्रमाणें शेअर होल्डर्सना ३ टक्के करमाफ डिव्हिडंड, बोर्डानें देणेचें ठरविलेचें व लौकरच ही बँक शेड्यूल्ड होणार आहे हें जाहीर करण्यांत आलें, व त्यानंतर नफातोटा पत्रक व डायरेक्टर्स निवडणूक वगैरे सर्व एकमतानें झाल्या. त्यानंतर खानापूरचे श्री. सोमण व श्री. तिनईकर यांनीं श्री. जी. डी. सराफ यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला व तोही एकमतानें पास झाला. यानंतर अध्यक्षाचे आभार, खानापूरचे श्री. गोरी यांनीं मानून बँकेच्या ताळेबंदाबद्दल प्रशंसा आपल्या भाषणांत व्यक्त केली व चहापानानंतर ही सभा संपली. ]

### डायरेक्टर-इन-चार्ज श्री. सराफ ह्यांचें भाषण

### ३५ हजार रु. नफा : बँकेच्या भरभराटीस पुनः प्रारंभ

"बँक स्थापन होऊन आज १४ वर्षे झालीं. १९४७ सालपर्यंत या बँकेचा काल फारच भरभराटींत गेला. परंतु पुढें बँकेला निष्कारण त्रास झाला. त्या गोष्टींचा उहापोह मी पुन्हां इकडे करूं इच्छित नाहीं, कारण ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी सार्वजनिक रीतीनें व कोर्टांतून सुद्धां स्पष्ट झालेली आहे. तरी हें सर्व होईतों-पर्यंत निष्कारण बँकेचें व बँकेच्या शेअर-होल्डर्सचेंही नुकसान झालें आहे. त्यांतल्या त्यांत आनंदाची गोष्ट म्हणजे या सर्व उपा-धींतून पार पडून बँकेनें या वर्षी चांगला नफा मिळविला व परत सर्व बाजूंनीं बँकेची प्रगति सुरू झाली आहे. लौकरच ती पुन्हां भरभराटीस पोहोंचेल अशी मला पूर्ण खात्री आहे. या भागांत लौकरच ही शेड्यूल्ड बँक होईल अशी मी आशा करतो व त्या दिशेनें प्रयत्नही चालू आहेत.

"या बँकेच्या पडत्या काळांत ज्या भागीदारांनीं व व्यापारी वर्गानें व कर्नाटकांतल्या प्रमुख नागरिकांनीं या बँकेबद्दल जो आत्मविश्वास दाखविला व या बँकेला जी मदत दिली व जो उत्साह दाखविला व ज्यामुळें ही बँक सर्व आपत्तींतून पार पडून पूर्व-स्थितीला येऊं शकली त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. आपला भारत देश स्वतंत्र झाल्यापासून आर्थिक घडामोडी फार मोठ्या प्रमाणावर झाल्या आहेत व होत आहेत. त्यामुळें बँकेचे व्यापही वाढत चालले आहेत. नवे नवे उद्योगधंदे वाढत आहेत, या सर्व कारणांमुळें यापुढें बँकांना कांहीं वर्षांनीं फारच महत्त्व प्राप्त होईल यांत शंका नाहीं. या वर्षी बँकेचें खेळतें भांडवल रु. ३८ लाखांवर असून तिला रु. ३५ हजार नफा झाला आहे. मागील तीन वर्षांतील सर्व तोटा वजा जातां भागीदारांना तीन टक्के डिव्हिडंड देण्याचें डायरेक्टर्स बोर्डानें ठरविलें आहे. ही सर्व प्रगति आपल्या सहकार्यानेंच घडून आली आहे."


सर्व प्रकारचें बँकिंगचें काम केलें जातें

धी युनायटेड कमर्शिअल बँक लि.

विक्री झालेलें भांडवल
रु. ४ कोटी
भरणा झालेलें भांडवल
रु. २ कोटी
राखीव निधी
रु. ६० लक्ष

मुख्य कचेरी
कलकत्ता

जी. डी. बिर्ला
चेअरमन

बी. टी. ठाकूर
जनरल मॅनेजर


'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनकोसोप. टेलिफोन नं. ३२१५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तू पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक; सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगा-वरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वाटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गा-ड्यांचे आंस, धावपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांस लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

## ऑस्ट्रेलियांतील बँकांचें एकीकरण : समान दर्जाच्या बँका एकत्र झाल्या

बँक ऑफ ऑस्ट्रेलेशिया आणि यूनियन बँक ऑफ ऑस्ट्रेलिया ह्या मोठ्या दोन बँकांचें लवकरच एकत्रीकरण होणार आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच हें एकत्रीकरण घडवून आणण्याचा दोन्ही बँकांचा विचार होता, परंतु ऑस्ट्रेलियांतील मि. चीफले ह्यांच्या मजूर मंडळानें तेथील सर्वच बँकांचें राष्ट्रीयीकरण करण्याचा प्रयत्न चालविल्यामुळें हें एकत्रीकरण स्थगित झालें. राष्ट्रीयीकरणाचा कायदा प्रिव्हि कौन्सिलनें बेकायदा ठरविल्यानंतर ह्या एकत्रीकरणास पुनः चालना मिळाली. एकत्रीकरणाची योजना आतां तयार झाली असून ती उभय बँकांच्या भागीदारांपुढें संमतीसाठीं मांडण्यांत येईल.

सध्याच्या दोन्ही बँका बंद करून त्यांची येणीं-देणीं नवी बँक—दि ऑस्ट्रेलियन अँड न्यूझीलंड बँक—घेईल. एकत्रित होणाऱ्या दोन्ही बँकांचें मिळून जेवढें वसूल भांडवल आहे, तेवढें ह्या नव्या बँकेचें होइल. मूळ एका बँकेचा चेअरमन नव्या बँकेचा चेअरमन होईल व दुसरीचा चेअरमन नव्या बँकेचा डेप्युटी चेअरमन होईल. नव्या बँकेच्या नांवांत मूळ कोणत्याहि बँकेच्या नांवाचें सादृश्य मुद्दामच ठेवलेलें नाहीं. दोन्ही बँका समान दर्जाच्या आहेत; कोणत्याहि एकींत दुसरी विलीन झालेली नाहीं हें स्पष्ट करणें-हा त्याचा हेतु आहे. म्हणजे, लग्नाचे दोन्ही जोडीदार समान-दर्जाचे आहेत. दोन्ही बँकांकडील ठेवींतच नव्हे तर इतरहि बाबतींत बरेंच साम्य आहे. दोन्ही बँका १०० वर्षांहून अधिक जुन्या आहेत आणि त्यांचा अनुभव व भक्कमपणा ह्यांमुळें ह्यांतून निर्माण झालेली नवी बँक यशस्वी होणार हें ठरल्यासारखेंच आहे.

---

### भोर स्टेट बँक लि.

वरील बँकेस १९५० सालीं ७,७७१ रु. नफा झाला आहे. त्यापैकी १,५६० रु. रिझर्व्ह फंडाकडें वर्ग करून ६,२५० रु. २½% करमाफ डिव्हिडंडसाठीं दिले जातील. बँकेच्या प्रयत्नामुळें, मुंबई सरकारनें बँकेस संस्थानच्या विलिनीकरणापूर्वी असलेल्या सर्व सवलती ३१-३-१९५२ अखेर चालू ठेवण्याचें ठरविलें आहे आणि पूर्वी भोर संस्थानाच्या नांवें असलेले शेअर्सहि मुंबई सरकार तोंवर स्वतःकडे ठेवणार आहे. बँकेच्या सर्वसाधारण कामावर आणि विशेषतः पुणें शाखेच्या कामावर देखरेख ठेवण्याचें जबाबदारीचें काम दक्षतेनें केल्याबद्दल डायरेक्टर रावसाहेब खोले ह्यांचे विशेष आभार बोर्डानें नमूद केले आहेत. रा. सा. खोले हें काम ते डायरेक्टर झाल्यापासून विनामोबदला करीत आहेत, असें समजतें. बँकेस त्यामुळें मोठेंच सहाय्य होत आहे. ( चेअरमनः श्री. म. व्यं. शिंगरे. मॅनेजर : श्री. आर. जी. आगाशे, बी. ए. ऑनर्स )

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,५०,००० | रोख व बँकांत | १,६७९८० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ३२,९१४ | इनव्हेस्टमेंटस | ८,६४,८३७ |
| ठेवी, इ. | ९,८७,२३४ | कर्जे | ५,७९,५७२ |
| इतर बँकांचीं देणीं | ३,३९,८६२ | | |

---

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.



( स्थापना १९१८ )
बचतीच्या विविध योजना
हेड ऑफिस— गिरगांव, मुंबई.
शाखा : दादर, माहीम, बेळगांव

### दि भारत इंडस्ट्रियल बँक लि, पुणें

वरील बँकेस गेल्या ( १९५० ) वर्षी २५, ३५४ रु. निव्वळ नफा झाला. त्यांतून १२,३०० रु. रिझर्व्ह फंडांत टाकून आणि इतर तरतुदी करून क्यु. प्रे. शेअर्सवर ६% व ऑर्डिनरी शेअर्सवर २½% करमाफ डिव्हिडंड देण्याची बोर्डाची शिफारस आहे. १९४८ व १९४९ ह्या वर्षांतील नफ्यावरील करासाठी केलेल्या तरतुदीपेक्षां जास्त कर अहवालाचे वर्षी प्रत्यक्ष द्यावा लागला आणि लोणावळा शाखेंत झालेल्या चोरीच्या रकमेवरहि कर देणें भाग पडलें, तरी सुद्धां एवढा नफा झालेला आहे. १९४८ सालांतील ह्या कर आकारणीविरुद्ध बँकेनें वरिष्ठ इनकम टॅक्स अधिकाऱ्यांकडे अपील केलें आहे. बँकेकडील ठेवींत वाढच झालेली आहे, ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. ( चेअरमनः श्री. बी. बी. वाळवेकर. मॅ. डायरेक्टर्स श्री.: आर. बी. साळवेकर, बी. ए., एलएल. बी. व श्री. एन. एन. क्षीरसागर. )

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ३,९९ ३८५ | कॅश व बँकांत | ९,८५,७११ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ५०,६०० | इनव्हेस्टमेंटस | २१,९८,३३० |
| ठेवी | ५३,७१,७६६ | कर्जें | २३,९०,५२१ |

---

### इंडस्ट्रिअल बँक लि., सांगली

१९५० सालीं वरील बँकेस १४,२९९ रु. नफा झाला. म. गांधी वधानंतरच्या जाळपोळीमुळें बँकेचें झालेलें नुकसान तिनें १९४८ व १९४९ ह्या वर्षांच्या नफ्यांतून लिहून टाकलेलें आहे आणि प्राथमिक खर्चहि जिंदगीचे बाजूस ठेवलेला नाहीं. नफ्यापैकीं २,८६० रु. रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करून, ३,५७५ रु. ची इनकम टॅक्सची तरतूद करून, २,५०० रु. डि. ई. फंडांत घालून आणि १२१२ रु. चा कॉंटिजन्ट फंड निर्माण करून ४,१५२ रु. चा विनियोग ३% डिव्हिडंडकडे करण्यांत येणार आहे. व्यक्तिशः दिलेलीं कर्जे पुनः देतांना तीं १०% कमी करीत नेण्याचें सावधगिरीचें धोरण रिझर्व्ह बँकेच्या तज्ज्ञ नेतृत्त्वाखालीं इं. बँकेनें अंगीकारलेलें आहे. बँकेचें नांव बदलून तें (१) डेक्कन इं. बँक, (२) सांगली इं. बँक, (३) महाराष्ट्र इं. बँक, ह्यापैकीं एक ठेवण्यासाठीं जरूर ती दुरुस्ती मेमोरँडम व आर्टिकल्समध्यें करण्यांत येणार आहे.

( चेअरमनः प्रो. पी. एम्. लिमये, एम्. ए., सेक्रेटरी व अकौंटंट : म. आ. कुलकर्णी कुसनाळकर, बी. ए., एलएल. बी. )

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १,३८,६२५ | रोख व बँकांत | १,१८,७७० |
| रिझर्व्ह | ५,९९७ | इनव्हेस्टमेंटस | ८०,४२७ |
| ठेवी इ. | ३,७१,६६७ | कर्जे | ३,३४,७६६ |

---

### ब्रिटिश सायकलींची निर्गत

ग्रेट ब्रिटननें १९५० सालीं २१,०९,८६४ सायकलींची निर्गत केली. त्यापैकीं सर्वांत जास्त म्हणजे २,३७,८८० सायकली मलायानें घेतल्या. पाकिस्तानाकडे २,१७,२३६ सायकली गेल्या. भारतांत १,२६,२१५ ब्रिटिश सायकली आल्या.

## संसदेंत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

१९५० मध्यें चहाचें उत्पादन ६०·५ कोटी पौंड झालें.

* * * *

राष्ट्रीय उत्पन्न समितीचा प्राथमिक अहवाल मार्च १९५१ अखेर तयार होईल.

* * * *

पोस्टल सेव्हिंग बँक आणि लहान बचत योजना यांतून जमा रकम—

१९४८— रु. २१·३६ कोटी
१९४९— रु. २२·१० कोटी
१९५०— रु. २९·५२ कोटी

* * * *

टापिओका पावडर आणि भुईमुग या पासून रोजीं ५ ते ७ टन कृत्रिम तांदूळ तयार करण्याचा कारखाना काढण्याबाबत सरकारचा विचार चालू आहे. रोजीं ३३६ पौंड तांदूळ करावयास रु. ७,००० चीं यंत्रसामग्री लागेल आणि ती येथेंच बनवितां येईल. या तांदुळाचा दर पौंडाला २॥ ते ३ आणे पडेल.

---

**राजस्थानांतील लोकरीचें उत्पादन**— राजस्थानांत दरवर्षी सुमारें ५ कोटी रुपयांची लोकर तयार होते. हें लोकरीचें उत्पादन भारतामधील एकूण उत्पादनाच्या ४० टक्के आहे. ह्या धंद्याचा विकास करण्यासाठी एक त्रैवार्षिक आणि एक पंचवार्षिक कार्यक्रम राजस्थान सरकारनें आखला आहे. लोकरीचें पृथःकरण, संशोधन, आणि मेंढ्यांची पैदास इत्यादि कामें करण्यासाठी १२,००,००० रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**युद्धोपयोगी मालाची निर्यात**— गेल्या डिसेंबर महिन्यांत सो. रशियानें अमेरिकेला ७,००,००० डॉलर्सचे मॅंगेनीज आणि क्रोम हे धातू निर्यात केले. देशाच्या संरक्षणाच्या व्यवस्थेच्या कामीं ह्या धातूंचा उपयोग होतो. अमेरिकेनें मात्र रशियाला फक्त १००,००० डॉलर्स किंमतीचा माल निर्यात केला. नोव्हेंबरमध्यें रशियानें ६,००,००० डॉलर्सचा माल निर्यात केला होता. डिसेंबरमध्यें ११,००,००० डॉलर्सचा माल निर्यात करण्यांत आला होता.

**बिनातिकिटाचे ३१,००० प्रवासी**— १९५० सालीं औध-तिरहुट रेल्वे मार्गावर ३१,००० प्रवाशांनीं तिकिट न काढतां प्रवास केला. त्यांच्यापैकीं २,३०० प्रवाशांना तुरुंगाची हवा दाखविण्यांत आली. प्रवाशांकडून वसूल करण्यांत आलेल्या दंडाची रकम ७१,००० रु. भरली. ह्याशिवाय सुमारें ३,२५,००० प्रवाशांकडून ५,५०,००० रु. जादा आकार म्हणून वसूल करण्यांत आले. ह्या रेल्वेच्या बोर्डानें १९५१–५२ सालीं उतारूंच्या सोयींवर ४४ लाख रु. खर्च करण्याचें ठरविलें आहे.

**ट्यूब वेल्स योजना आटोपली**— इंटरनॅशनल मॉनेटरी बॅंकेकडून मिळावयाच्या कर्जाचा उपयोग करून ४,५६५, ट्यूब वेल्स बांधण्याची योजना भारत सरकारनें आंखली होती. हें कर्ज देण्यास बँक तयार नसल्यानें योजना बारगळली आहे. तथापि उत्तर प्रदेश, बिहार व पंजाब ह्या राज्यांनीं मात्र आपला कार्यक्रम पार पाडण्याचें ठरविलें आहे. भारत सरकार त्यांना जरूर तितकें कर्ज देणार आहे.


दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

बँकेचें भांडवल


| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ४,७१,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २,७५,००,००० |

बँकेनें गतवर्षासाठीहि ५ टक्के करमाफ नफा वाटला आहे.

मुख्य कचेरी लक्ष्मी रोड, पुणें २. — चिं. वि. जोग, मॅनेजर.

( पॅरमाउंट लि. )

रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ता:—PEDNECO, Bombay. फोन नं. २२७३८

उंची कपड्याचा व स्नानाचा उत्तम साबण

निर्मल सोप

दि माणिक सोप वर्क्स, कराड (सातारा)


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.